# प्रकरण चौथे

## कर्ज

# प्रकरण चौथे

## क र्ज

### प्रस्तावना:

आयुष्यात प्रत्येकालाच कर्जाची गरज भासते. उद्योजक, व्यापारी, व्यावसायिक, शेतकरी यांना आपल्या व्यवसायासाठी अशी गरज निर्माण असते. तर नोकरपेशा व्यक्तीला त्याच्या कौटुंबिक गरजा भागविण्यासाठी (आजारपण, शिक्षण, लग्न कार्य, धार्मिक विधी) कर्ज लागते. प्रसंगी काही स्थावर संपादनासाठीही त्याला कर्जाची गरज भासते. केवळ स्वत:च्या निश्चीत उत्पन्नातून गरजा भागविणारी माणसेच विरळ, आजचे युग तर विकासाचे युग आहे. आयुष्यभर बचत करा आणि शेवटी त्या बचतीतून स्थावर (घर आदी) उभे करा. हा काळ आता मागे पडला आहे. आजची गरज वाहन, घर , प्लॉट, फर्निचर, टी.व्ही. एक ना अनेक वस्तू आजच मागवा. त्यासाठी हवे तर कर्ज काढा आणि मासिक उत्पन्नातून त्याची परतफेड करा. ही जनरिती झाली आहे.

कर्जाची ही गरज भागविण्याचे काम विविध पतसंस्था करीत असतात. या संस्था सभासदांची गरज, त्यांची कर्जफेडीची क्षमता आणि संस्थेची आर्थिक स्थिती यांना विचार करुन कर्ज देण्याचे कार्य करतात.

### ४:१ शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेचे वेरेला कर्जपुरवठा:

पतसंस्थेच्या प्रमुख उद्दिष्टांपैकी सभासदांना कर्ज पुरवठा करणे हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. सभासदांना त्यांच्या वैयक्तिक जबाबदारीवर (हमीवर) कर्जे दिली जातात.

पतपेढी संस्था सभासदांची पत (क्रेडिट) पाहून जास्तीत जास्त एका सदस्यास त्याच्या एकूण पगाराच्या १५ पट किंवा रु. २०,०००.०० यापैकी कमी असणाऱ्या रकमेपर्यंत कर्ज पुरवठा करते.

सभासदांनी कर्जाची परतफेड कर्ज घेतल्याच्या तारखेपासून समान ४८ मासिक हप्त्यात केली पाहिजे. सभासदांनी घेतलेल्या कर्जावरील व्याज-दर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून घेतलेल्या कर्जावरील व्याज-दरापेक्षा जास्तीत जास्त ३ टक्के जादा राहिल. सध्या संस्थेचा कर्ज व्याजदर १५ टक्के आहे.

सभासदाने कर्ज घेणेपूर्वी पुढील प्रमाणे करारनामा करून देण्याची अट घालण्यात आली आहे. "संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची अगर जामीनकीची जबाबदारी संपेपर्यंत मी माझ्या सध्याच्या नोकरीचा राजीनामा देणार नाही."

सभासदास नवीन कर्ज देताना मागील कर्जाचे १० मासिक हप्ते झाल्या-शिवाय नवीन कर्ज देण्यात येत नाही. तसेच नवीन कर्ज देताना मंजूर कर्जातून पहिले सर्व कर्ज भरून घेतले जाते व राहिलेली रक्कम कर्जाऊ दिली जाते.

संस्थेने केलेल्या कर्ज पुरवठ्यातील वाढ पुढील कोष्टकावरून दिसून येते.

कोष्टक क्र. ४:१

कर्ज रकमेतील वाढ

(रुपयामध्ये)

| अ.नं. | वर्ष (३० जून) | कर्जाची रक्कम | कर्ज रकमेतील वार्षिक वाढ (%) |
|---|---|---|---|
| १) | १९६९-७० | उपलब्ध नाही | -- |
| २) | १९७०-७१ | २५,६५५.०० | --- |
| ३) | १९७१-७२ | ३५,३६७.१२ | ३७.८६ |
| ४) | १९७२-७३ | ५३,१३६.४१ | ५२.५० |
| ५) | १९७३-७४ | १,१८,२९२.०० | ११९.३२ |
| ६) | १९७४-७५ | १,७३,४५०.३१ | ४९.६३ |
| ७) | १९७५-७६ | २,४१,७४७.५४ | ३९.३७ |
| ८) | १९७६-७७ | ३,४०,४००.०० | ४०.८१ |
| ९) | १९७७-७८ | ३,८८,८००.०० | १४.२२ |
| १०) | १९७८-७९ | ४,६१,७९०.०० | १८.७७ |
| ११) | १९७९-८० | ५,८९,६४७.५२ | २७.६९ |
| १२) | १९८०-८१ | ७,५३,९३७.२० | २७.८६ |
| १३) | १९८१-८२ | १७,७१,३७७.६० | १३७.६० |
| १४) | १९८२-८३ | १६,६०,०८३.०० | - ७.३३ |
| १५) | १९८३-८४ | २७,५९,१९८.१० | ६६.२१ |
| १६) | १९८४-८५ | ४२,११,२९०.०० | ५२.६३ |
| १७) | १९८५-८६ | ८३,६३,३२५.०० | ९८.५९ |
| १८) | १९८६-८७ | ७५,३६,५४५.०० | - ९.८८ |
| १९) | १९८७-८८ | ८२,९७,५१५.०० | १०.०९ |
| २०) | १९८८-८९ | १,१३,२१,७१६.२५ | ३६.४५ |

संदर्भ: शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेचे सन १९७१-७२ ते सन १९८८-८९ पर्यंतचे वार्षिक अहवाल.

UNIVERSITY

सन १९६९-७० यावर्षीची कर्जपुरवठा आकडेवारी संस्थेकडून उपलब्ध न झाल्याने, पुढील वर्षाचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक नं. ३:१ वरून असे दिसते की, सन १९७०-७१ मध्ये सभासदांना दिलेल्या कर्जाची रक्कम रु. २५,६५५.०० होती. त्यामध्ये सन १९७३-७४ साली रु. १,१८,२९२.०० पर्यंत वाढ झाली आहे. म्हणजेच ही वाढ ३६१.०९ टक्के आहे. तसेच सन १९७४-७५ ते १९७८-७९ या कालात कर्ज रक्कम १६६.२४ टक्क्यानी वाढली आहे. ही वाढ कमी होण्याचे मुख्य कारण म्हणजे सभासद मासिक ठेव फक्त ३७.४२ टक्क्यानी वाढली आहे. पुढील समांतर पाच वर्षांच्या कालावधी मध्ये कर्ज रक्कम ३६७.९४ टक्क्यानी वाढली आहे. आणि सन १९८४-८५ ते सन १९८८-८९ या कालावधीत कर्ज पुरवठा फक्त १६८-८४ टक्क्यानी वाढला आहे. या कालात कर्ज पुरवठा वाढीचे प्रमाण कमी होण्याचे मुख्य कारण म्हणजे बाहेरील कर्जामध्ये घट झाली आहे. तसेच भाग-भांडवल वाढीचे प्रमाण सुध्दा कमी झाले आहे.

सन १९७०-७१ ते सन १९८८-८९ या कालावधीत एकूण कर्ज पुरवठा ४४०३०.९५ टक्क्यानी वाढला आहे. तर या कालावधीत वार्षिक सरासरी वाढ ४२.७६ टक्के आहे.

यावरून असे दिसून येते कर्ज पुरवठा हा ठेवी, बाहेरील कर्जे व भाग भांडवल यातील वाढीवर अवलंबून आहे.

संस्थेने सभासदांना केलेल्या कर्जपुरवठयातील सर्वाधिक वाढ सन १९८१-८२ या वर्षी झाली आहे. या सालात कर्ज रक्कमेत १३७.६० टक्क्यांनी वाढ झाली आहे. कर्ज पुरवठयात वाढ होण्याचे प्रमुख कारण म्हणजे १९८१-८२ साली मासिक ठेवी ६९.७९ टक्क्यानी वाढल्या आहेत. तसेच संस्थेने ३००० रुपये पर्यंत असलेली कर्ज कमाल मर्यादा वाढविली आहे. ही

कर्ज मर्यादा सभासदाच्या भागाच्या रक्कमेच्या १० पट अगर पगाराच्या रक्मेच्या ८ पट अगर ५००० रुपयापर्यंत वाढविली. परिणामी यावर्षी कर्ज रक्कमेत सर्वाधिक वाढ झाली आहे.

परंतु सन १९८६–८७ साली कर्ज रक्कम ९.८८ टक्क्यानी घटली आहे. कारण सभासद संख्या फक्त ३.१९ टक्क्यानी वाढली असून भाग भांडवलातील वाढ अत्यल्प १३.२९ टक्के आहे. तसेच मासिक ठेवी १८.०४ टक्क्यानी वाढल्या आहेत.

सभासदांना कर्ज पुरवठा जास्तीत जास्त करता यावा यासाठी संस्थेने १९८६–८७ साली "ब" वर्ग सभासदांकडून सहा महिन्यांहून कमी नाहीत अशा मुदती ठेवी स्वीकारण्यास सुरुवात केली आणि १९८७–८८ पासून कर्ज मंजूर करताना सभासदांची वैयक्तिक शेअर्स मर्यादा रुपये ५०००.०० पूर्ण होईपर्यंत दहा टक्के प्रमाणे शेअर कपात करण्याचे ठरविले आणि नंतर पाच हजार शेअर मर्यादा पूर्ण झाल्यावर पाच टक्के प्रमाणे शेअर्स कपात करणेत येईल. परिणाम या बदलामुळे संस्थेच्या भांडवलात वाढ होण्यास मदत होऊन पुढील वर्षी कर्ज पुरवठा १०.०९ टक्क्यानी वाढला असल्याचे दिसून येते.

४:२ <u>वसूल झालेले कर्ज व येणे कर्ज:</u>

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेने सभासदांना दिलेले कर्ज शिवाजी विद्यापीठामार्फत परस्पर सभासदांच्या पगारातून कर्ज हप्ता जमा करून घेतला जातो. त्यामुळे संस्थेस कर्ज वसूलीबाबत अडचणी रहात नाहीत. परंतु अन्य सहकारी वित्तीय संस्थांना वसुलीबाबत अनेक अडचणी येतात. परिणामी त्यांची थकबाकी वाढत जाते. तसेच या पतसंस्थेच्या आर्थिक व्यवहारात कर्ज वसुली समान मासिक हप्त्याने होत असल्याने येणे कर्ज

रक्कमेत सातत्याने बदल निदर्शनास येतो. या संस्थेच्या वसूल झालेल्या कर्ज पुरवठयाबाबत आणि वर्षा अखेरीस येणे असलेल्या रक्कमेबाबत निष्कर्ष काढण्यासाठी पुढील तक्ता मार्गदर्शक ठरतो.

## कोष्टक क्र.४:३

### वसूल झालेले कर्ज व वर्ष अखेरीस येणे कर्ज

| अ.नं. | वर्ष | वसूल झालेले कर्ज | वर्ष अखेरीस येणे कर्ज | वसूल झालेले कर्जवार्षिक वाढ (%) | येणे कर्ज वार्षिक वाढ (%) |
|---|---|---|---|---|---|
| १) | १९६९-७० | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही | -- | -- |
| २) | १९७०-७१ | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही | -- | -- |
| ३) | १९७१-७२ | ३२,१६७.६५ | १९,८५०.४७ | -- | -- |
| ४) | १९७२-७३ | ४८,४८८.९३ | २५,२९८.०३ | ५०.७४ | २७.४४ |
| ५) | १९७३-७४ | ८६,३२५.४२ | ५७,२६४.६१ | ७८.०३ | १२६.३६ |
| ६) | १९७४-७५ | १,५६,०२८.५८ | ७४,६८६.३४ | ८०.७४ | ३०.४२ |
| ७) | १९७५-७६ | १,९३,२९३.८२ | १,२३,१४०.०६ | २३.८८ | ६४.८८ |
| ८) | १९७६-७७ | २,८८,८६९.१३ | १,७४,६७०.९३ | ४९.४४ | ४१.८५ |
| ९) | १९७७-७८ | ३,२०,९२१.०५ | २,४२,५४९.८८ | ११.०९ | ३८.८६ |
| १०) | १९७८-७९ | ३,८२,६५०.७१ | ३,२१,६८९.१७ | १९.२३ | ३२.६३ |
| ११) | १९७९-८० | ४,९६,१४३.२२ | ४,१५,१९३.४७ | २९.६६ | २९.०७ |
| १२) | १९८०-८१ | ६,४५,९४४.७० | ५,२३,१८५.९७ | ३०.१९ | २६.०१ |
| १३) | १९८१-८२ | ७,६६,५९५.६२ | १५,४७,१६७.९५ | १८.६८ | १९५.८७ |
| १४) | १९८२-८३ | १४,६५,०२९.४५ | १७,४३,०२१.५० | ९१.११ | १२.६० |
| १५) | १९८३-८४ | १९,७४,९३६.११ | २५,२७,२८३.४९ | ३४.८० | ४४.९९ |
| १६) | १९८४-८५ | ३३,११,६६९.०४ | ३४,२६,९०४.४५ | ६७.६८ | ३५.५९ |
| १७) | १९८५-८६ | ६०,३०,६७८.१० | ५७,५९,५५१.३५ | ८२.१० | ६८.०७ |
| १८) | १९८६-८७ | ६७,७९,७४८.३० | ६५,१६,३४८.०५ | १२.४२ | १३.१४ |
| १९) | १९८७-८८ | ६६,६४,२९७.४५ | ८१,४९,५६५.६० | - १.७० | २५.०६ |
| २०) | १९८८-८९ | ९१,७५,३८२.५० | १,०२,९५,९८४.३५ | ३७.६८ | २६.३४ |

संदर्भ: शिवाजी विद्यापीठ सहकारी पतपेढी संस्थेचे सन १९७१-७२ ते १९८८-८९ पर्यंतचे वार्षिक अहवाल.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

कोष्टक नं. ४:२ वरुन असे दिसून येते की, १९७१-७२ साली रुपये ३५,१६७.६५ कर्ज वसूल झाले होते तर १९७३-७४ साली रु.८६,३२५.४२ एवढे कर्ज वसूल झाले म्हणजेच या काळात एकूण १४५.४७ टक्के कर्ज वसूल झाले आहे. याच कालावधीत येणे कर्ज हे १८८.४९ टक्के झाले आहे. यानंतर सन १९७४-७५ ते १९७८-७९ या पाच वर्षांच्या कालावधीत १४५.२४ टक्के कर्ज वसूल झाले असून येणे कर्ज मात्र ३३०.७२ टक्के असल्याचे दिसून येते. सन १९७९-८० ते १९८३-८४ या कालावधीत २९८.०६ टक्के कर्ज वसूल झाले आहे. तर ५०८.७० टक्के कर्ज येणे आहे. यापुढील सर्वांतर पाच वर्षांच्या कालावधी-मध्ये १७७.०६ टक्के कर्ज वसूल केले तर २००.४४ टक्के कर्ज येणे आहे. यावरुन असे दिसून येते की वसूल कर्जापेक्षा येणे कर्ज जास्त आहे. कारण सभासदांना कर्ज दिल्यानंतर त्याची वसूली ठराविक मासिक हप्ते (४८) ठरवून केली जाते. त्यामुळे येणे कर्जात वाढ दिसून येते.

संस्थेचे एकूण अठरा वर्षांच्या कालावधीत सर्वात जास्त येणे कर्ज १९८१-८२ साली १९५.८७ टक्के असल्याचे दिसून येते. कारण संस्थेने यावर्षी कर्ज मर्यादा ३००० रुपयांवरुन ५००० रुपयापर्यंत वाढविल्याने जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून ८,४०,०००.०० रुपये कर्ज घेतले त्यामुळे याच वर्षी संस्थेने सर्वाधिक १३७.६० टक्के कर्ज पुरवठा केला आहे. त्यामुळे येणे कर्ज वाढले आहे. तसेच कर्ज मर्यादा सुध्दा वाढविली आहे. परंतु कर्ज वसूली मात्र चार वर्षांच्या कालावधीत होते. तसेच संस्थेने सन १९८२-८३ साली सर्वाधिक कर्ज वसूली केली आहे. ही वसूली ९१ टक्के झाली आहे. याच वर्षी कर्ज पुरवठा मात्र ७.३३ टक्क्यानी घटला आहे.

संस्थेची कमी कर्ज येणे सन १९८२-८३ साली फक्त १२.६० टक्के कर्ज येणे आहे. ही गोष्ट संस्थेच्या दृष्टीने चांगली आहे. कारण यावर्षी

कर्जवसूली सर्वात जास्त झाल्याने येणे कर्ज कमी आहे. तसेच संस्थेची कर्ज वसूली १९८७-८८ साली पूर्वीपेक्षा १.७० टक्क्यानी घटली आहे. कारण यावर्षापूर्वीच्या वर्षी १९८६-८७ साली कर्जपुरवठा ८३ लाखावरून, ७५ लाखापर्यंत कमी झाल्याने कर्ज वसूली कमी झाल्याचे दिसून येते.

यावरून असे दिसून येते की संस्थेच्या कर्ज पुरवठयाबरोबर संस्थेची कर्ज वसूली व येणे कर्ज रक्कम वाढत आहे.

४:३ <u>हायर पर्चेस कर्ज योजना:</u>

संस्थेच्या सभासदांना कोणत्याही घरगुती उपयुक्ततेची अगर अत्यावश्यक गरजेची वस्तू एकाच वेळी रक्कम खर्च करून खरेदी करणे शक्य होत नाही. त्यांची इच्छा असूनही त्यांना त्यापासून वंचीत रहावे लागते. याचा विचार करून संस्थेने हायर पर्चेस कर्ज योजना लागू करण्याचा निर्णय सन १९८५-८६ मध्ये घेतला. सभासदांकडून काहीही रक्कम भरून न घेता जास्तीत जास्त रुपये ५०००.०० पर्यंत हायर पर्चेस कर्ज देण्याचे ठरविण्यात आले. या कर्जाची परत फेड समान ६० मासिक हप्त्यात केली पाहिजे.

त्यानुसार १९८६-८७ साली सुमारे ४५९ सभासदांनी या योजनेचा लाभ घेतला. यावर्षी सभासदांना रुपये २२,६४,४३९.०० इतकी रक्कम कर्ज वाटप केली. या कर्जापैकी रुपये ३,५४,२२३.०० इतकी रक्कम वसूल होऊन वर्ष अखेर रुपये १९,१०,२१६.०० एवढी हायर पर्चेस कर्ज रक्कम येणे होती.

परंतु हायर पर्चेस कर्जाचे कागदपत्राबाबत व काही तांत्रिक अडचणीमुळे हायर पर्चेस कर्ज योजना १९८७-८८ सालात बंद करण्यात आली. यावर्षी योजना बंद करण्यापूर्वी रु. ६,२२,६२०.०० इतके कर्ज वाटप करण्यात आले.

तसेच हायर पर्चेस कर्जापोटी सभासदांकडून वर्षभरात रु. १५,१०,०८६.०० एवढी रक्कम वसूल झाल्याने साल अखेरीस रु. १०,२२,७५०.०० एवढी रक्कम येणे आहे. पुढील वर्षी १९८८-८९ साली सभासदांकडून रुपये ९,१६,५९५.०० एवढी रक्कम वसूल होऊन व सहामाही व्याज पध्दतीने व्याजापोटी रुपये ४६,८२६.०० जमा धरून नावे टाकल्याने साल अखेरीस रु. १,५२,९८१.०० एवढी हायर पर्चेस कर्ज रक्कम सभासदांकडून येणे आहे.

४:४ थकबाकी:

सहकारी संस्थांसमोरील सर्वात मोठा प्रश्न म्हणजे वाढती थकबाकी होय. वाढती थकबाकी सहकारी संस्थांच्या प्रगती व विकासातील अडथळा बनते. थकबाकीचा हा प्रश्न मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी सहकारी बँका व नागरी पतपेढी संस्थांना भेडसावू लागला आहे.

सहकारी संस्थांच्या थकबाकीची कारणे पाहता असे दिसते की, कर्ज-दारांची पैसे परतफेडीची पात्रता (क्षमता) योग्यरितीने न अजमावणे, कर्जदारास त्याच्या जरुरी पेक्षा अधिक कर्ज मंजूर करणे, कर्जदारास त्याच्या मागणीपेक्षा अतिशय कमी कर्ज मंजूर करणे, कर्ज मागणी अर्जाची छाननी काळजीपूर्वक न करणे, कर्ज दिल्यावर योग्य कालावधीत वसूलीचा पाठपुरावा न करणे, एकाच कारणासाठी मोठया प्रमाणावर कर्ज मंजूर करणे इ. अनेक कारणांमुळे थकबाकी वाढल्याचे दिसून येते.

परंतु कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थांना हा प्रश्न भेडसावत नाही. कारण संस्था व सभासद यांचे अत्यंत जवळचे संबंध व सतत चालू असणारा संपर्क सुशिक्षित व सुजाण सभासद, सभासदांच्या उत्पन्नाची शाश्वती, संस्था प्रशासनाची चांगली माहिती व आपल्या जबाबदारीची जाणीव असलेल्या

संचालकांची उपलब्धता, कार्यक्षरीच्या कामकाजाची शक्यता इ. कारणांमुळे कर्ज वसुली सुलभ होते. त्यामुळे कर्ज व्यवहार सरळ, सरळीत व सुलभ असतात.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेची थकबाकी नसल्याचे दिसून येते. कारण सभासदांना दिलेल्या कर्जाची वसूली ही त्यांच्या मासिक वेतनाच्या रक्कमेतून केली जाते. शिवाजी विद्यापीठामार्फत संस्थेस सभासदांचा कर्जाचा हप्ता दरमहा परस्पर जमा केला जातो. त्यामुळे थकबाकी राहू शकत नाही आणि जर का कदाचित मृत्यु किंवा निवृत्ती किंवा इतर कारणांनी सभासद शिवाजी विद्यापीठ सेवेतून कमी झाल्यास, त्याचे येणे असलेले कर्ज त्याच्या जामीनदारांकडून किंवा त्यांच्या ग्रॅच्युएटी, पेन्शन इतर फंड यामधून जमा करुन घेतली जाते. त्यामुळे या कर्मचारी पतपेढी संस्थेस थकबाकीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

४:५ <u>एकूण उलाढाल:</u>

पतपेढी संस्थेच्या एकूण उलाढालीमध्ये सभासद शेअर्स, सभासद कायम ठेव सभासद मासिक ठेव, वर्गणी, सभासद कर्ज, सभासद कर्ज व्याज, बँक क्लिन कॅश क्रेडिट, सभासद मुदतबंद ठेव, सभासद लाभांश, सर्व प्रकारच्या ठेवी व इतर घटकांचा समावेश होतो.

एकूण उलाढालीवरुन संस्थेने केलेल्या व्यवहारांची कल्पना येते. संस्थेची प्रगती व सर्वसाधारण परिस्थिती यांचा अंदाज येतो.

पुढील कोष्टकावरुन संस्थेच्या एकूण उलाढाल रक्कमेतील वाढीची कल्पना येते.

कोष्टक क्र. ४:३

एकूण उलाढालीतील वाढ (रुपयामध्ये)

| अ.नं. | वर्ष (३० जून) | एकूण उलाढाल रक्कम | एकूण उलाढालीतील वार्षिक वाढ (%) |
|---|---|---|---|
| १) | १९६९-७० | उपलब्ध नाही | --- |
| २) | १९७०-७१ | ७३,७३०.१४ | --- |
| ३) | १९७१-७२ | १,२३,७८९.१२ | ६७.७६ |
| ४) | १९७२-७३ | १,६५,६९८.२२ | ३३.८५ |
| ५ ) | १९७३-७४ | २,८४,८५८.७३ | ७१.९१ |
| ६) | १९७४-७५ | ४,३१,८४८.०९ | ५१.६० |
| ७) | १९७५-७६ | ५,५५,६२३.५५ | २८.६६ |
| ८) | १९७६-७७ | ७,९७,७३१.६६ | ४३.५७ |
| ९) | १९७७-७८ | ९,०८,२५१.०० | १३.८५ |
| १०) | १९७८-७९ | १०,७९,८४५.०० | १८.८९ |
| ११) | १९७९.८० | १३,७०, ९६९.०० | २६.९६ |
| १२) | १९८०-८१ | १७,२३,६६२.०० | २५.७३ |
| १३) | १९८१-८२ | ३२,७६,१४९.१९ | ९०.०७ |
| १४) | १९८२-८३ | ४०,२०,४३५.८३ | २२.७२ |
| १५) | १९८३-८४ | ५९,०६,३०१.३७ | ४६.९१ |
| १६) | १९८४-८५ | ९२,५५,६३७.६७ | ५६.७१ |
| १७) | १९८५-८६ | १,४२,२९,०६२.९१ | ५३.७३ |
| १८) | १९८६-८७ | १,५१,२१,२४०.२४ | ११.८९ |
| १९) | १९८७-८८ | १,६८,४१,९८०.७५ | ५.७८ |
| २०) | १९८८-८९ | १,९७,८४,२४२.४० | १७.४७ |

संदर्भ: शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेचे सन १९७०-७१ ते सन १९८८-८९ पर्यंतचे वार्षिक अहवाल.

कोष्टक क्र. ४:३ वरून असे दिसून येते की, सन १९७०-७१ साली एकूण उलाढाल रु. ७३,७९०.१४ होती. त्यामध्ये सन १९७३-७४ साली रुपये २,८४,८५८.७३ पर्यंत म्हणजे २८६.०४ टक्क्यानी वाढ झाली आहे. तसेच सन १९७४-७५ ते सन १९७८-७९ या पाच वर्षाच्या कालावधीत एकूण उलाढाल १५०.०५ टक्के झाल्याचे दिसून येते. ही वाढ कमी होण्याचे कारण म्हणजे या कालावधीत ठेवीतील वाढ फक्त ३७.४२ टक्के झाली आहे. तर सन १९८४-८५ ते १९८८-८९ या काळात ही वाढ फक्त ११३.७५ टक्के असल्याचे दिसून येते.

१९८१-८२ साली एकूण उलाढाल सर्वाधिक म्हणजे ९०.०६ टक्के झाली आहे. आहे. यावर्षी मासिक ठेवीतील वाढ सर्वात जास्त ६१.७९ टक्के, कर्ज मर्यादा वाढविल्याने कर्ज रक्कमेत १३७.६० टक्कयानी वाढ झाल्याचे दिसून येते. तसेच यावर्षी संस्थेने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँककडून रु. ८,४०,०००.०० कर्जाची उचल केल्याने कर्ज व्यवहार वाढले व एकूण उलाढाल मोठया प्रमाणात वाढली.

या उलट १९८७-८८ साली एकूण उलाढाल फक्त ५.७८ टक्कयानी वाढली आहे कारण यावर्षी सभासद संख्या कमी झाली आहे. (०.६७ टक्के) आणि भाग भांडवलातील वाढ सर्वात कमी १०.८९ टक्के झाली आहे. तर कर्ज रक्कमेतील वाढ फक्त १०.०९ टक्के झाली आहे. तसेच कायम ठेव वाढ ३७८.७५ टक्कयावरून ५८.४४ टक्कयापर्यंत कमी झाली आहे. तसेच संस्थेने जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून घेतलेल्या बँक विदाउट कॅश क्रेडिट कर्जामध्ये ३:१ टक्कयानी घट झाली आहे.

या वीस वर्षाच्या कालावधीत एकूण उलाढाल २६७११.४९ टक्कयानी वाढली आहे. तर सरासरी वाढ ही ३६.२१ टक्के आहे.

यावरून असे दिसून येते की, संस्थेच्या एकूण व्यवहारात मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून संस्था स्वत:च्या भक्कम पायावर उभी आहे.

४:६ उत्पन्न व खर्च:

संस्थेने केलेल्या एकूण व्यवहारांच्या प्रमाणात संस्थेला उत्पन्न मिळते. पतपेढी संस्थेस अनेक विविध मार्गांनी उत्पन्न मिळते. त्यापैकी प्रमुख उत्पन्न मिळण्याचे मार्ग - सभासद कर्ज व्याज, हायर पर्चेस कर्ज व्याज, मुदतबंद ठेव कर्ज व्याज, बँक डिव्हिडंड, रिझर्व फंड ठेव व्याज, बँक मुदतबंद ठेव व्याज, फॉर्म विक्री, पासबुक विक्री इ.

संस्थेला उत्पन्ना बरोबरच खर्च करावा लागतो. या खर्चामध्ये सर्व प्रकारच्या ठेवीवरील व्याज, बँक कर्ज व्याज, नोकर पगार, मिटींग खर्च, प्रवास खर्च, पोस्टेज, छपाई खर्च, ऑडीट फी खर्च, मेहनताना खर्च, सादिलवार खर्च, नोकर बोनस, जाहिरात खर्च, निधी खर्च, किरकोळ खर्च इ. चा समावेश होतो.

संस्थेचे जसजसे एकूण व्यवहार वाढत जातील तसतसे उत्पन्न व खर्च यामध्ये वाढ होत गेलेली दिसते.

तक्ता क्र. ४:४

उत्पन्न व खर्च

(रुपयामध्ये)

| अ.नं. | वर्ष (३० जून) | उत्पन्न | खर्च | उत्पन्नातील वार्षिक वाढ (%) | खर्चातील वार्षिक वाढ (%) |
|---|---|---|---|---|---|
| १) | १९६९-७० | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही | -- | -- |
| २) | १९७०-७१ | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही | -- | -- |
| ३) | १९७१-७२ | १,७६०.८३ | ५४५.०८ | -- | -- |
| ४) | १९७२-७३ | २,४८४.८० | ३०३.४२ | ४१.१२ | -४४.३३ |
| ५) | १९७३-७४ | ३,७९८.३५ | ३८३.८७ | ५८.८६ | २६.५१ |
| ६) | १९७४-७५ | ६,२२६.११ | ३२२.९० | ६३.९४ | -१५.८८ |
| ७) | १९७५-७६ | ९,६३२.०१ | १,६५०.५२ | ५४.६८ | २५६.३१ |
| ८) | १९७६-७७ | १६,०४८.३५ | ३,१६६.६० | ६६.६४ | १७५.२३ |
| ९) | १९७७-७८ | २१,९८८.६६ | ५,३२५.७० | ३५.१५ | ६८.१८ |
| १०) | १९७८-७९ | ३१,५११.७५ | ५,५७८.१६ | ४५.३३ | ४.७४ |
| ११) | १९७९-८० | ४३,०१४.४१ | ७,४८४.२० | ३६.४७ | ३४.१७ |
| १२) | १९८०-८१ | ५३,८३७.२६ | ९,६११.२१ | २५.१६ | २९.५४ |
| १३) | १९८१-८२ | १,११,६००.२१ | ५५,४५७.११ | १०७.२१ | ४७२.०१ |
| १४) | १९८२-८३ | २,३३,९६२.०० | १,२३,९०१.०७ | १०१.६४ | १२३.४ |
| १५) | १९८३-८४ | २,८४,६४८.२८ | १,२८,७३५.७१ | २१.६६ | ३.९० |
| १६) | १९८४-८५ | ४,६४,८७७.०७ | २,४८,०५६.०२ | ६३.३२ | ९२.६१ |
| १७) | १९८५-८६ | ६,७१,२५८.४८ | ३,७५,६७३.४० | ४६.११ | ५१.४५ |
| १८) | १९८६-८७ | ११,३४,१३१.०१ | ७,५०,२४०.९७ | ६६.९७ | ९९.७ |
| १९) | १९८७-८८ | १४,६६,३११.१० | ९,७१,१८७.३५ | २९.२१ | ३०.५ |
| २०) | १९८८-८९ | १४,८१,००१.७५ | ८,९०,१८१.३५ | १.४० | — ९.०१ |

संदर्भ: शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेचे सन १९७१-७२ ते १९८८-८९ पर्यंतच्या वार्षिक अहवालावरून.

सन १९६९-७० व सन १९७०-७१ या वर्षीची उत्पन्न व खर्चाची आकडेवारी उपलब्ध होऊ न शकल्याने सन १९७१-७२ नंतरच्या वर्षाचे विश्लेषण केले आहे.

कोष्टक क्र. ४:४ वरून असे दिसून येते की, १९७१-७२ ते १९७३-७४ या कालावधीत उत्पन्नातील वाढ ११५.७१ टक्के झाली आहे. मात्र खर्चामध्ये २९.५७ टक्क्याची घट झाली आहे. १९७४-७५ ते १९७८-७९ या पाच वर्षाच्या कालावधीत संस्थेचे उत्पन्न ४०८.१८ टक्क्यानी वाढले आहे. मात्र खर्च १६२७.५२ टक्क्यानी वाढला आहे. खर्चामध्ये वाढ होण्याचे मुख्य कारण म्हणजे सभासदांच्या ठेवींमध्ये वाढ होत होती व त्या ठेवींवर व्याज द्यावे लागत असल्याने संस्थेचा खर्च वाढल्याचे दिसते. १९७९-८० ते १९८३-८४ या पाच वर्षामध्ये उत्पन्न ५६१.७५ टक्क्यानी मात्र खर्च १६२०.१० टक्क्यानी वाढला आहे. या पुढील पाच वर्षामध्ये उत्पन्न २१९.८७ टक्क्यानी मात्र खर्च २५८.८७ टक्क्यानी वाढला आहे. यावरून असे दिसून येते की, संस्थेच्या उत्पन्नातील वाढीपेक्षा खर्चामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली आहे.

सन १९७१-७२ ते सन १९८८-८९ या अठरा वर्षाच्या कालावधीत उत्पन्नात ८४३४८.९१ टक्के वाढ झाली तर खर्चातील वाढ १,६३,२१३.५२ टक्के झाली आहे. या काळातील उत्पन्नातील वार्षिक सरासरी वाढ ५३.५२ टक्के आणि खर्चातील वार्षिक सरासरी वाढ ८७.९१ टक्के झाली आहे. म्हणजेच संस्थेच्या खर्चामध्ये दिवसेंदिवस वाढ होते आहे.

संस्थेच्या उत्पन्नातील सर्वाधिक वाढ १९८२-८३ मध्ये १०९.८४ टक्के झाली आहे. कारण यावर्षी सभासदांना दिलेल्या कर्जाची वसूली ११.११

टक्के एवढया मोठया प्रमाणात झाली आहे. परिणामी कर्ज व्याजाचे उत्पन्नात वाढ झाली आहे. याउलट सन १९८८-८९ साली उत्पन्नात फक्त १.४० टक्क्यानी वाढ झाली आहे. कारण हायर पर्चेस कर्ज योजना बंद केल्याने त्यापासून कर्जव्याजापोटी मिळणारे उत्पन्न कमी झाले. याचे एकूण उत्पन्नाशी असलेले १९.२४ टक्के प्रमाण ४.२३ टक्के पर्यंत घसरले.

संस्थेच्या खर्चामध्ये १९७२-७३ साली ४४.३३ टक्क्यानी घट झाली आहे. कारण एकूण खर्चाशी ऑडिट फीचे असलेले प्रमाण गतवर्षीच्या (५०० रु.) ९१.७३ टक्के वरुन (१७५ रु.) ५७.६७ टक्के पर्यंत घसरले. परिणामी खर्चात घट झाली आहे. याउलट १९८१-८२ मध्ये खर्चातील वाढ ४७२.०९ टक्के झाली आहे. कारण जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून रुपये ८,४०,०००.०० कर्ज घेतल्याने बँक कर्ज व्याजापोटी खर्च केलेल्या रकमेचे प्रमाण एकूण खर्चाच्या ३४ टक्के आहे. तसेच सभासद ठेव व्याजामध्ये गतवर्षी पेक्षा १६५ टक्के वाढ झाली असल्याने खर्च वाढला आहे.

वरील विवेचनावरुन असे दिसून येते की, संस्थेच्या एकूण आर्थिक व्यवहारांच्या संख्येत व एकूण उलाढाल, कर्ज वितरण, बँकेकडून घेतलेले कर्ज यातील वाढीबरोबर उत्पन्न व खर्च यामध्ये वाढ झाली आहे. परंतु उत्पन्नातील वाढीपेक्षा संस्थेचा खर्च मोठया प्रमाणात वाढत गेला आहे.

४:६७ एकूण नफा:

बँकिंग हा देखील व्यवसाय असल्याने व्यापाऱ्या प्रमाणेच नफा मिळविणे हा बँकेचा मुख्य उद्देश असतो. अनेक नागरी सहकारी बँका व्यवहार व व्यवस्थापन खर्च कमी करून नफा मिळवितात आणि व्यापारी बँका नफा मिळविण्यासाठीच प्रयत्न करीत असतात. परंतु कर्मचारी सहकारी पतसंस्था फक्त नफा मिळविण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या नसून सभासदांना जास्तीत जास्त सोयी, सवलती देण्यासाठी व त्यांचा फायदा होण्यासाठी कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देणे, त्यांच्यासाठी विकास व कल्याण-कारी योजना राबविणे यासाठी स्थापन झालेल्या आहेत. संस्थेला मिळणारा नफा हा संस्थेचे एकूण उत्पन्न व खर्च यातील फरकावर अवलंबून असतो.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेच्या एकूण नफ्यामध्ये गतवर्षीचा शिल्लक नफा अधिक चालू वर्षीचा नफा यांचा समावेश केलेला आहे. संस्थेच्या नफ्यातील वाढ पुढील कोष्टकामध्ये दर्शविली आहे.

## कोष्टक क्र. ४:५

### एकूण नफ्यातील वाढ

(रुपयामध्ये)

| अ.नं. | वर्ष (३० जून) | एकूण नफ्याची रक्कम | एकूण नफ्यातील वार्षिक वाढ (%) |
|---|---|---|---|
| १) | १९६९-७० | उपलब्ध नाही | -- |
| २) | १९७०-७१ | ७४१.९५ | -- |
| ३) | १९७१-७२ | १,२१५.७५ | ६३.८६ |
| ४) | १९७२-७३ | २,१८१.३८ | ७९.४३ |
| ५) | १९७३-७४ | ३,६३०.४५ | ६६.४३ |
| ६) | १९७४-७५ | ६,४६५.३३ | ७८.०९ |
| ७) | १९७५-७६ | ८,५३१.३४ | ३१.९५ |
| ८) | १९७६-७७ | १२,९११.०८ | ५२.२७ |
| ९) | १९७७-७८ | १८,४८८.६७ | ४२.३२ |
| १०) | १९७८-७९ | २७,४३१.६७ | ४८.३[illegible] |
| ११) | १९७९-८० | ३५,९३०.७१ | ३०.९८ |
| १२) | १९८०-८१ | ४४,२०८.७५ | २३.०४ |
| १३) | १९८१-८२ | ५६,११४.७२ | २८.७४ |
| १४) | १९८२-८३ | १,१०,४४०.०८ | ९४.०४ |
| १५) | १९८३-८४ | १,५६,५०४.५७ | ४१.७१ |
| १६) | १९८४-८५ | २,१७,९८१.५० | ३९.२८ |
| १७) | १९८५-८६ | ३,०४,४८५.०३ | ३९.६८ |
| १८) | १९८६-८७ | ३,८४,३५४.०० | २६.२३ |
| १९) | १९८७-८८ | ४,८७,७२५.१५ | २६.८९ |
| २०) | १९८८-८९ | ५,९७,३४४.०९ | २२.४८ |

संदर्भ: शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेचे सन १९७०-७१ ते १९८८-८९ पर्यंतचे वार्षिक अहवाल.

कोष्टक क्र. ४:५ वरुन असे दिसून येते की, १९७०-७१ साली एकूण नफा रु. ७४१.९५ होता. तर १९७३-७४ मध्ये रु.३६३०.३५ पर्यंत नफा वाढला ही वाढ ३८९.३१ टक्के झाली आहे. सन १९७४-७५ ते सन १९७८-७९ या कालावधीत एकूण नफा ३६४.६२ टक्क्यानी वाढला आहे तर १९७९-८० ते १९८३-८४ या कालावधीत नफा ३३५.५७ टक्क्यानी वाढला आहे. तसेच या पुढील समांतर पाच वर्षाच्या कालावधीत फक्त १७४.६६ टक्क्यानी नफ्यात वाढ झाली आहे. यावरुन शेवटच्या पाच वर्षांच्या कालावधीत एकूण नफ्याच्या वार्षिक वाढी-मध्ये घट झाल्याचे दिसून येते. कारण या कालावधीत संस्थेने पाणपोई बांधून ती विद्यापीठाकडे सुपुर्त केली. तसेच सन १९८७-८८ यावर्षी सभासदांना व्याजात सूट दिली (वर्षात जमा झालेल्या बारा महिन्यांच्या एकूण व्याज रक्मेवर १० टक्के प्रमाणे सूट दिली) त्यामुळे संस्थेचा नफा कमी झाला आहे. तसेच संस्थेचे कर्ज वितरण सन १९८६-८७ मध्ये ९.८८ टक्क्याने घटल्याने व्याजापोटी मिळणाऱ्या रक्कमेत घट झाली. या कारणांमुळे संस्थेचा नफा घटला असल्याचे दिसून येते.

एकूण नफ्यातील सर्वाधिक वाढ १९८२-८३ साली ९४.०४ टक्के झाली आहे. कारण यावर्षी कर्ज वसूली ११.११ टक्के एकदम मोठ्या प्रमाणात झाल्याने तसेच संस्थेचे वार्षिक उत्पन्न १०९.६४ टक्क्यानी वाढल्यामुळे एकूण नफ्यामध्ये वाढ झाली आहे.

त्याचप्रमाणे सन १९८८-८९ मध्ये नफा वार्षिक वाढ सर्वात कमी (२२.४७ टक्के) आहे. कारण संस्थेने हायर पर्चेस कर्ज योजना बंद केल्याने व्याजरुपाने मिळणारे उत्पन्न कमी झाले. संस्थेचे उत्पन्नातील वाढ फक्त १.४० टक्के झाली. आणि संस्थेच यावर्षी एकूण नफ्यातील वाढ कमी झाली आहे.

संस्थेस १९७०-७१ ते १९८८-८९ या एकोणीस वर्षांच्या कालावधीत एकूण नफ्यातील वाढ ८०४१० टक्के झाली आहे. तर सरासरी वार्षिक वाढ ४३.९९ टक्के झाली असल्याचे दिसून येते.

वरील विवेचनावरुन असे दिसून येते की, संस्थेस या कालावधीत कधीही तोटा झालेला नाही. संस्थेचा नफा एकूण आर्थिक व्यवहारांच्या वाढी-बरोबर वाढत आहे. संस्थेच्या विकासाच्या दृष्टीने ही जमेची बाजू आहे. यावरुन संस्था भक्कम, मजबूत पायावर उभी असल्याचे दिसून येते.

## ४:८ नफा विभागणी:

सहकारी संस्थेने आपल्या सभासदांशीच मुख्यत: व्यवहार करावेत अशी अपेक्षा असल्याने त्यातून संस्थेने नफा संपादनाचा प्रश्न उद्‌भवत नाही. उलटपक्षी किमान खर्चात सेवा पुरवावी असेच धोरण असते. तरीही आनुषंगिक कारणां-मुळे व्यवहारात वर्षअखेरी वाढावा (नफा) दिसल्यास त्याचे वितरण कसे करावे असा प्रश्न स्वाभाविक-पणे निर्माण होतो. वाढाव्यातील सभासदांना परत करावयाचा भाग किती असावा याचाही धोरणाच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या तज्ञांच्या अहवालात अग्रक्रम दाखवून दिलेला आहे. उपलब्ध वाढावा प्रथम व्यवसायाच्या विकासासाठी सहकारी संस्थेने वापरावा, सभा-सदांना सामान्य स्थाने अधिकाधिक सेवा कार्यक्षमरीतीने पुरविण्यासाठी किंवा सभासदांना त्यांनी संस्थेशी केलेल्या व्यवहारांच्या प्रमाणात विभागून देण्यासाठी वापरावा. सहकारी संस्थेच्या व्यवस्थापनाला व विकासाला हा अग्रक्रम पोषकच आहे. तरीही हे प्रमाण ठरविण्याचा अधिकार संस्थेच्या एकूण सर्वसाधारण सभेस आहे.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेस मिळणारा नफा विविध घटकांमध्ये विभागला जातो ते घटक पुढील प्रमाणे आहेत=

राखीव निधी, सभासद लाभांश, लाभांश समीकरण निधी, धर्मादाय निधी, सभासद कल्याण निधी, इमारत निधी, बुडीत कर्ज निधी रौप्य महोत्सवी निधी, बोनस डिव्हिडंड, सभासद विकास योजना इ.

शिवाजी विद्यापीठ, कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेच्या अधिनियम कलम क्रमांक ६४, ते ६९ व नियम क्रमांक ५० ते ५३ व ५५ मधील तरतुदींना अधीन राहून नफ्याची विभागणी खालील बाबींवर केली जाते.

१) कमीत कमी २५ टक्के राखीव निधी करिता.

२) जास्तीत जास्त ९ टक्के (सध्या १२ टक्के) दराने लाभांश वाटण्याकरिता.

३) नियम क्र. ५३ अन्वये द्यावयाच्या शिक्षण निधीकरिता.

४) भागभांडवलाच्या दोन टक्के नियम क्र. ५२ प्रमाणे उभारावयाच्या लाभांश समीकरण निधी करिता.

५) भाग भांडवलाच्या २ टक्के नियम क्र. ५२ प्रमाणे उभारावयाच्या अधिलाभांश समीकरण निधी करिता.

६) नफ्याच्या १ टक्का तारण पत्र किंमत चढ उतार-निधी करिता.

७) नफ्याच्या २० टक्के पर्यंत अधिनियम कलम क्र. ६९ प्रमाणे सार्वजनिक, धर्मादाय अशा प्रकारच्या कामाकरिता.

वरील बाबींवर विभागून शिल्लक राहीलेला नफा खालील बाबींवर विभागला जातो.

१) शिल्लक नफ्याच्या २० टक्के पर्यंत विनावेतन काम करणाऱ्यांना मानधन देण्याकरिता.

२) शिल्लक नफ्याच्या २० टक्के पर्यंत संस्थेच्या पगारी कर्मचाऱ्यांना दोन महिन्याच्या पगाराइतका अधिलाभांश वाटण्याकरिता.

३) शिल्लक नफ्याच्या १० टक्के पर्यंत संस्थेच्या सदस्यांचे शिक्षण,

कोष्टक क्र. ४:६

नफा विभागणी

| अ.नं. वर्ष (३०जून) | राखीव निधी २५ टक्के | सभासद लाभांश | लाभांश समीकरण निधी | धर्मादाय निधी | सभासद कल्याण निधी | इमारत निधी | बुडित कर्ज निधी | रौप्य महोत्सवी निधी | बोनस डिव्हिडंड (३१) | कलम ६९(३) सभासद विकास योजना | शिल्लक नफा | एकूण नफा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १) १९७६-७७ | ३,२४७.७७ (२५.०० %) | ७,६१७.६० (५८.६४) | — | — | — | — | — | — | — | — | २,१२५.७१ (१६.३६) | १२,९९१.०८ (१००) |
| २) १९७७-७८ | ४,०१०.७४ (२२.१३) | १२,९०७.८५ (६९.८२) | — | — | — | — | — | — | — | — | १,४९०.०८ (८.०६) | १८,४८८.६७ (१००) |
| ३) १९७८-७९ | ६,४८५.४० (२३.६४) | १८,५८५.८५ (६७.६१) | — | — | — | — | — | — | — | — | २,४००.४२ (८.७५) | २७,४३१.६७ (१००) |
| ४) १९७९-८० | ८,८८२.५० (२४.७२) | २४,९८१.५१ (६९.५३) | — | — | — | २,०००.०० (५.५७) | — | — | — | — | ६६.०० (०.१८) | ३५,९३०.७१ (१००) |
| ५) १९८०-८१ | ११,०५२.१५ (२४.९९) | ३१,३८४.१० (७०.९९) | — | — | — | १०००.०० (२.२६) | — | — | — | — | ७७२.५० (१.७५) | ४४,२०८.७५ (१००) |
| ६) १९८१-८२ | १३,९३८.५५ (२४.८८) | ४१,४२३.८३ (७२.७८) | — | — | — | १०००००० (१.७६) | — | — | — | — | ३५२.३४ (०.६२) | ५६,९१४.७२ (१००) |
| ७) १९८२-८३ | २७,५१५.२५ (२४.९९) | ५९,९९६.७० (५३.६०) | — | — | — | ३५००.०० (३.१७) | — | — | १९६३६.०५ (१७.७८) | | ५१२.०८ (०.४८) | १,१०,४४०.०८ (१००) |
| ८) १९८३-८४ | [illegible] (२४.९०) | ८८,६६०.[illegible] (५२.२७) | — | — | २००८.०० (१.१२) | ३५००.[illegible] (२.८७) | — | — | २०२१६.५० (१७.३१) | — | ११६०.८५ (०.७४) | १,५६,५०४.५१ (१००) |
| ९) १९८४-८५ | ५४,०८०.२५ (२४.८१) | १,५३,४९३.३० (७०.४२) | — | — | २००८.०० (०.९२) | ७०००.०० (३.[illegible]) | — | — | — | ५००.०० (०.२३) | ६९९.९५ ([illegible]) | २,१७,९८१.५० (१००) |
| १०) १९८५-८६ | [illegible],८९९.२७ (२४.९३) | २,२८,१३२.८० (७१.६४) | — | — | १५००.०० (०.४९) | ८०००.०० (२.६३) | — | — | — | ५००.०० (०.१६) | ४५५.३६ (०.१५) | ३,०४,८८५.०३ (१००) |
| ११) १९८६-८७ | ९५,९७४.५० (२४.९७) | २,७५,८६६.१० (७१.७७) | — | — | २५००.०० (०.६५) | ९०००.०० (२.३४) | — | — | — | ५००.०० (०.१३) | ५१३.४० (०.१३) | ३,८४,३५४.०० (१००) |
| १२) १९८७-८८ | १,२१,८०३.२१ (२४.९७) | ३,१३,६७०.२० (६४.३१) | २४,५२०.०० (५.०३) | २७००.०० (०.५५) | १००००.०० (२.०५) | १००००.०० (२.०५) | ३०००.०० (०.६२) | १५०० .०० (०.३१) | — | — | ५३१.६४ (०.११) | ४,८७,७२५.१५ (१००) |
| १३) १९८८-८९ | १,४९,२०३.२० (२४.९८) | ३,८३,७३९.२० (६४.२४) | २८,९२५.०० (४.८४) | ३०००.०० (०.५) | १००००.०० (१.६७) | १००००.०० (१.६७) | ३०००.०० (०.५) | ९०००.०० (१.५) | — | — | ४७६.६१ (०.०८) | ५,९७,३४४.०१ (१००) |

कंसातील अंक एकूण नफ्याशी प्रमाण दर्शवितात (टक्केवारी)

संदर्भ: शिवाजी विद्यापीठ,कर्मचारी सहकारी पतपेढी संस्थेचे सन १९७६-७७ ते १९८८-८९ पर्यंतचे वार्षिक अहवाल.

मदत व सार्वजनिक उपयुक्त बाबींचा प्रसार यांचा समावेश असलेल्या कोणत्याही सरकारी अगर धर्मादाय बाबी करिता.

४) शिल्लक नफ्याच्या १० टक्के पर्यंत इमारत निधीकरिता.

५) शिल्लक नफ्याच्या २० टक्के पर्यंत विशेष अडचणीच्या वेळी गंगाजळी-करिता (स्पेशल इमर्जन्सी रिझार्व फंडाकरिता)

६) शिल्लक नफ्याच्या २० टक्के पर्यंत अधिलाभांश वाटण्याकरिता.

७) शिल्लक नफ्याच्या २० टक्के पर्यंत इतर उपयुक्त कारणाकरिता.

या सर्व गोष्टींवर नफा विभागून राहिलेला शिल्लक नफा पुढील वर्षीच्या नफ्यात मिळविला जातो. वरील प्रमाणे विभागणी संस्था आपल्या गरजेप्रमाणे व सोयीनुसार वापरते.

अ) संस्थेचे नफा विभागणीचे घटक:

१९६९-७० ते १९७५-७६ या वर्षांची नफा विभागणी पतसंस्थेकडून उपलब्ध न झाल्याने यापुढील १९७६-७७ नंतरच्या वर्षांचे विवेचन केले आहे.

१) राखीव निधी:

सहकारी संस्थांचा भांडवल उभारण्याचा हा अंतर्गत मार्ग आहे. संस्थेला होणारा सर्व नफा सभासदांमध्ये लाभांश म्हणून न वाटता, त्याचा काही भाग आर्थिक अडचणीच्या वेळी उपयोग व्हावा म्हणून वेगवेगळया निधीकडे वर्ग करण्यात येतो. अशा प्रकारे राखीव निधी, डेव्हलपमेंट रिझार्व, रिप्लेसमेंट रिझार्व, डिप्रीसिएशन रिझार्व इ. निधी उभारले जातात. यापैकी राखीव निधीकडे नफ्याचा काही भाग वर्ग करणे कायद्यानेच आवश्यक असते.

उदा. भारतातील व कायद्यानुसार सहकारी संस्थेच्या नफ्याच्या १/४ (२५ टक्के) भाग त्यावर्षी राखीव निधीकडे वर्ग करणे बंधनकारक असते. संस्थेच्या प्रगतीसाठी व भविष्यकाळात येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी असे निधी उभारणे हितकारक असते.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्था एकूण नफ्यापैकी २५ टक्के भाग राखीव निधीत जमा करते.

कोष्टक क्र. ४:६ वरुन असे दिसून येते की, एकूण नफ्यातील वाढीबरोबर राखीव निधीचे प्रमाणही वाढले आहे.

१९७६-७७ साली राखीव निधी रु. ३२४७.७७ होता. त्यामध्ये १९८८-८९ पर्यंत रु. १,४९,२०३.२० पर्यंत वाढ झाली आहे. ही वाढ ४४९४ टक्के असल्याचे दिसून येते. राखीव निधीचे प्रमाण एकूण नफ्यावर अवलंबून असते.

२) सभासद लाभांश:

सहकाराच्या प्रमुख वैशिष्टयातील, सभासदांचा अधिक्यात सहभाग हे एक प्रमुख वैशिष्टय आहे. कारण सहकारी संस्था सभासदांची संस्था असून सभासद संस्थेच्या कार्यात सहभागी होत असल्याने संस्थेला मिळालेला नफा सभासदांनी संस्थेबरोबर केलेल्या व्यवहारांच्या प्रमाणात परत केला जातो.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतसंस्थाने १९८४-८५ पूर्वी सभासदांना ९ टक्के लाभांश वितरण केले. परंतु सहकारी कायद्यातील बदलानुसार सन १९८४-८५ नंतर सभासदांना १२ टक्के लाभांश वाटला.

कोष्टक क्र. ४:६ वरून असे दिसून येते, की १९७६-७७ साली रुपये ७६१७.६० एवढा नफा सभासदांना वाटण्यात आला होता. आणि १९८८-८९ मध्ये रुपये ३,८३,७३९.२० एवढा लाभांश वाटण्यात आला. या कालावधीतए एकूण लाभांशातील वाढ ४९३७.५३ टक्के असल्याचे दिसून येते. यावरून असे दिसून येते की, सभासदांना मिळणाऱ्या लाभांशामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. १९७६-७७ साली रु. १८.७२ प्रत्येकी लाभांश दिला होता. मात्र १९८८-८९ साली त्यामध्ये ४८८.८४ पर्यंत वाढ झाली आहे.

३) <u>लाभांश समीकरण निधी:</u>

सहकारी संस्थांच्या कायद्यानुसार प्रत्येक संस्थेस लाभांश समीकरण निधी नफ्यातून वेगळा काढावा लागतो. कारण संस्थेस एखाद्या वर्षी नफा कमी झाला तर संस्था कायद्याप्रमाणे १२ टक्के लाभांश वाटू शकत नाही. त्यामुळे ही घाट भरून काढण्यासाठी लाभांश समीकरण निधीची तरतूद करण्यात आली आहे.

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी पतपेढी संस्था सन १९८७-८८ पूर्वी लाभांश समीकरण निधी जमा करित नव्हती. कारण संस्थेस तोटा होण्याचा प्रश्न उद्‌भवत नव्हता. संस्थेची कर्ज वसूली शंभर टक्के होत असल्याने या निधीची गरज भासली नाही. परंतु १९८७-८८ साली मे. सरकार नियुक्त लेखा परिक्षाकांनी सूचना केल्याप्रमाणे हा निधी उभारण्यात आला. १९८७-८८ मध्ये रुपये २४,५२०.०० (एकूण नफ्याच्या ५.०३ टक्के) एवढी रक्कम या निधीत जमा केली. मात्र १९८८-८९ साली रु. २८,९२५.०० (एकूण नफ्याच्या ४.८४ टक्के) एवढा निधी शिल्लक टाकला. या निधीचा उपयोग भविष्यकालात एखाद्या वेळी नफा कमी झाल्यास करता येईल. त्यामुळे सभासदांचा विश्वास वाढू शकेल.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY

४) धर्मादाय निधी:

संस्था हा निधी सत्यनारायण पूजा, गणेश चतुर्थी व इतर धार्मिक विधींवर खर्च करते. त्यामुळे सर्व सभासद एकत्र येण्यास मदत होते. हा निधी संस्थेने १९८७-८८ सालापासून उभा केला आहे. या निधीचे १९८८-८९ या वर्षी एकूण नफ्याशी प्रमाण फक्त ०.५ टक्के आहे.

५) सभासद कल्याण निधी:

या निधीचा विनियोग विशिष्ट कारणासाठी केला जातो. ज्यावेळी संस्थेच्या सभासदाचा अचानक मृत्यु होतो त्यावेळी त्याच्या कुटुंबियाना थोडा फार आर्थिक हातभार लावण्याच्या दृष्टीने या निधीची उभारणी केली आहे. सध्या मयत सभासद व्यक्तीच्या कुटुंबियांना १०००.०० रु. मदत दिली जाते. या निधीमध्ये एकूण नफ्याच्या १ ते २ टक्के रक्कम जमा केली जाते. १९८३-८४ मध्ये रु. ३०००.०० या निधीत जमा केले. तथापि १९८८-८९ साली रु. १०,०००.०० या निधीत जमा केले आहेत.

६) इमारत निधी:

संस्थेने इमारत निधी जमा करण्याचे मुख्य कारण म्हणजे संस्थेचे सभासद दिवसेंदिवस वाढत आहेत. त्याचप्रमाणे संस्थेचे कामकाज व व्यवहार वाढत आहेत. त्यामुळे संस्थेस स्वत:ची इमारत असणे आवश्यक आहे. त्यासाठी एवढी मोठी रक्कम एकदम उभा करणे शक्य नाही म्हणून सध्यापासून थोडी-थोडी रक्कम या निधीच्या खात्यावर जमा केल्यास इमारत बांधते वेळी संस्थेस इतर संस्थेकडून कर्ज काढावे लागणार नाही. यासाठी हा निधी उभारण्यात आला आहे. सन १९७९-८० साली रु. २०००.०० मात्र

१९८८-८९ साली रु. १०,०००.०० या निधीत जमा केले. संस्थेने या निधीत किती रक्कम ठेवावी यावर बंधन नाही.

७) बुडीत कर्ज निधी:

सहकारी कायद्यानुसार संस्थेस बुडीत कर्ज निधी उभारावा लागतो. पगारदार नोकरांच्या पतसंस्थांची कर्जे बुडण्याची शक्यता कमी असते. तरीसुध्दा संस्थेच्या वाढत्या व्यवहारामुळे व कर्ज वितरणामुळे कदाचित कर्ज बुडालेच तर ते या निधीतून भरून काढले जाते. संस्था सुरुवातीस हा निधी उभारत नव्हती परंतु मे. सरकार नियुक्त लेखा परिक्षकांनी केलेल्या सुचनेनुसार सन १९८७-८८ पासून रु. ३०००.०० दरवर्षी या निधीत जमा केले आहेत.

८) बोनस डिव्हिडंड निधी:

सहकारी कायद्यानुसार संस्थेस ९ टक्के सभासद लाभांश वाटता येत होता. सभासदांना जास्त लाभांश वाटता यावा यासाठी संस्थेने १९८२-८३ व १९८३-८४ साली ९ टक्के लाभांश व ३ टक्के बोनस डिव्हिडंट निधी अशी तरतूद केली. संस्थेने एकूण नफ्याच्या १७ टक्के रक्कम बोनस डिव्हिडंड स्पाने वाटली. १९८२-८३ मध्ये रु. १९,६३६.०५ व १९८३-८४ मध्ये रु.२७,२१६.५० एवढी रक्कम वाटण्यात आली. यानंतरच्या कालावधीत सहकारी कायद्यानुसार सभासदांना १२ टक्के लाभांश वाटण्यात येऊ लागल्याने संस्थेने बोनस डिव्हिडंड निधी बंद केला.

९) रौप्य महोत्सवी निधी:

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी सहकारी पतपेढी संस्था १९६९ साली स्थापन झाली असून तिला १९९४ ला पंचवीस वर्षे पूर्ण होत आहेत. त्यावेळी पार

पाडल्या जाणाऱ्या रौप्य महोत्सवी समारंभ खर्चाची तरतूद करणेच्या दृष्टीने १९८७-८८ साली रु. १,५००.०० व १९८८-८९ साली रु.९०००.०० एकूण नफ्यातून या निधीत जमा करण्यात आले. अशा प्रकारे पुढील वर्षी ही निधी उभारण्यात येणार आहे.

१०) सभासद विकास योजना:

संस्थेचे सभासद व त्यांच्या कुटुंबियांपैकी मुले, मुली यांनी शैक्षणिक क्षेत्रात किंवा क्रिडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविल्यास त्यांना या निधीतून बक्षीस रूपाने मदत दिली जाते. त्यामुळे सभासद व त्यांच्या मुलांना प्रोत्साहन मिळते व त्यांची प्रगती साधण्यास मदत होते. संस्थेने १९८४-८५ ते १९८६-८७ या तीन वर्षी, दरवर्षी रु. ५००.०० सभासद विकास योजनेंतर्गत खर्च टाकले आहेत.

संस्थेने वरील प्रमाणे नफ्याची विभागणी केली आहे. यावरून असे दिसून येते की संस्थेस कोणत्याही वर्षी तोटा सहन करावा लागलेला नाही. संस्थेच्या नफ्यातील वाढीबरोबर सभासदांचा लाभ वाढत आहे.